# छंद अक्षरांचा

## ललितलेख

**डॉ. सहदेव चौगुले-शिंदे**
एम.ए.पीएच.डी. एल.एल.बी. स्पेशल

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 296

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**छंद अक्षरांचा** (ललित लेख) **: डॉ. सहदेव आबासाहेब चौगुले-शिंदे**

© **सौ. विजया सहदेव शिंदे** -एम.ए

'सालस', ११८२/८३, प्लॉट नं. १५,
८ वी गल्ली, राजारामपुरी पूर्व,
कोल्हापूर- ४१६ ००८
फोन : ०२३१-२५२८४५६, मो.९८२३४३१२८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

सौ. विजयास

काटा टोचला
तरी तू
फूल तोडायचे
सोडले नाहीस
वेलीवरची श्रद्धा
ढळू दिली नाहीस.

# मनोगत

अगदी सूक्ष्मपणे पाहिल्यानंतर असं आढळून येतं की, अक्षर हेच ज्ञानाची पहिली पायरी आहे. अक्षरांच्या समूहातून, सागरातूनच एक विश्व उभं राहतं. वाचनाचा वा लेखनाचा छंद हा अंतिमतः अक्षरांचाच छंद असतो. अक्षरांनीच अर्थ दिला जगायला आणि जगण्यालाही. म्हणून या पुस्तकाला 'छंद अक्षरांचा' हे शीर्षक द्यावसं वाटलं.

लेखन करणं म्हणजे स्वतःचा स्वतःच न्यायनिवाडा करणं असतं. आपलं मूलभूत विचारविश्व, भावविश्व, तत्त्वविश्व व अनुभूती विश्व हे आपल्या नित्याच्या जीवनाप्रमाणं लेखनाचेही मूलाधार आहेत. त्यांच्याशी फारकत घेऊन आपण आपलं समर्थन करू शकत नाही.

एकाच देहात वसत असलेल्या हृदय आणि मन यांना वेगळं करता येत नाही, तसेच आपल्या भावना आणि विचार यांनाही एकमेकांपासून संपूर्णपणे अलग करता येत नाही. कधी हृद्याची हाक आल्यानंतर मन त्याची पाठराखण करतं,तर कधी मनाची हाक आल्यानंतर हृदय त्याला पाठबळ देतं. कधीकधी ती दोघं भिन्नभिन्न मार्गानं जाताना दिसतात, हेही खरं.

उत्कट भावना आणि प्रामाणिक अनुभूती समर्पक शब्दांत व्यक्त होतात तेव्हा ते लेखन लालित्यपूर्णच होते. अशा भावना आणि अनुभूती यांचं संरक्षण करण्यासाठी सीमेवर का असेना विचार हा असतो, असावा लागतो. 'छंद अक्षरांचा' मधील लेखांचा समावेश झाला आहे तो या धारणेतूनच.

घर हे प्रत्येकाचा प्रमुख आधार असतं. घर म्हणजे आपणच असतो. घर म्हणजे विविध प्रकारची नातीगोती असतं. अशा घरातील नात्यागोत्यांचा आपल्यावर फार प्रभाव असतो. त्या प्रभावामुळं आपल्या मनात जी भावनिक व वैचारिक आंदोलनं निर्माण होतात ती या पुस्तकातील काही लेखात शब्दबद्ध झाली आहेत. घरानंतर शाळेचा, शिक्षकांचा एक प्रमुख प्रभाव आपल्यावर असतो. ज्या वातावरणात आपण वाढतो, तिथली माणसं, प्रवासात भेटलेली माणसं आपल्याला काही सांगत असतात, काही देत असतात. अशा माणसांबद्दलही काही लेख या पुस्तकात घातले आहेत.

माझा जन्म भेडसगाव या खेडेगावतील. तिथंच माझं बालपण गेलं. तिथंच काही छंद जडले, आवडीनिवडी ठरल्या. नंतरच्या शहरी वातावरणातही ते छंद आणि त्या आवडीनिवडी शाबूत राहिल्या. गावाकडल्या शेतांनी आणि झाडांनी घातलेला मोह, त्यांच्याबद्दलचं आकर्षण काही लेखांतून व्यक्त झालं आहे. आमच्या आडनावातील बदलाचं स्पष्टीकरण 'आमचे अण्णा' या लेखात आलं आहे.

भावना आणि चिंतन यांच्या संगमातून काही लेखांचा जन्म झाला आहे.

अक्षर आणि शब्द यांच्याविना लिहिणं, बोलणं या क्रिया होऊच शकत नाहीत. म्हणून त्यांच्याबद्दलच्या दोन-तीन लेखांचा इथे समावेश केला आहे.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्राध्यापकाची नोकरी मिळवताना नोंद घेण्यासारखे काही वेगळे अनुभव आले. ते पहिलेवाहिले अनुभव या पुस्तकाच्या शेवटच्या लेखात टिपले आहेत.

'छंद अक्षरांचा' मधील काही लेख विविध दैनिकांतून पूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्या दैनिकांच्या संपादकांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

प्रकाशक श्री. उल्हास डी. मेहता व शितल मेहता या पिता-पुत्रांच्या माझ्यावरील प्रेम व लोभामुळंच माझा 'छंद अक्षरांचा' आज जगजाहीर होत आहे. मुद्रित शोधक श्री. मोहन रावळ, मुखपृष्ठकार चित्रमित्र पब्लिसिटीचे मालक, अक्षरजुळणी श्री. रावजी देसाई या सर्वांच्या अथक प्रयत्नांमुळंच हे पुस्तक सिद्ध झालं आहे. या सर्वांचा मी आभारी आहे.

श्री. भीमराव पवार (राशिवडेकर), श्री. कृष्णा हारूगडे, श्री. अरुण लोंढे, श्री. धोंडीराम नाईक, प्रा. बी. जी. दुधाळे, श्री. शंकर हारूगडे, सौ. रंजना महादेव अतिग्रे व प्रा. विलास चौगुले यांनी दिलेल्या प्रेरणा सतत उत्साहवर्धक ठरल्या आहेत.

मला अक्षरांचा छंद लावला तो माझ्या शिक्षकांनी. तो जोपासायला प्रोत्साहन आणि स्वातंत्र्य दिलं ते माझे आई-वडील, आजी, मामा, मित्र, इतर परिचित, अनेक ग्रंथपाल आणि माझे असंख्य विद्यार्थी यांनी. या सर्वांच्या ऋणात राहणं मी पसंत करतो. युवराज, अविनाश, श्वेता, अनिकेत, अस्मिता व श्रीया यांनी वेळोवेळी केलेली मदत सतत स्मरणात राहण्यासारखीच आहे.

**-डॉ. सहदेव चौगुले-शिंदे**

''चांगल्या पुस्तकाचं मूल्य हे त्याच्या छापील किमतीपेक्षा अनंत पटीनं जास्त असतं. खरं म्हणजे पुस्तक हेच एक मूल्य असतं. ते एक विचार असतं, एक आचार असतं, एक सुप्त संभाषण असतं. कधी त्यात परिवर्तनाचं छुपं वादळ असतं, तर कधी दु:खी जीवांचं सांत्वन करण्याचं त्यात सामर्थ्य असतं.

माझ्या अशा वृत्तीमुळंच जगण्यावर माझी गाढ श्रद्धा बसते. बोचणारे काटे आणि फुलांच्या मुलायम पाकळ्या यांच्याकडं मी तटस्थपणे पाहू शकतो. मनाचा समतोल राखू शकतो. आनंदाच्या शिखरावरून मी कधी दु:खाची खोली पाहिलीय, तर कधी दु:खाच्या गर्तेतच आनंदाच्या गुहा बांधल्यात.

संत, महात्मे लोकांचे अश्रू पुसू शकतील, त्यांच्या अश्रूंच्या अस्तित्वाचं कारण नाही पुसून टाकू शकणार. अश्रू हा एक थेंब आहे, तर अस्तित्व हे एक महासागर आहे आणि जिथं जिथं अस्तित्व आहे तिथं तिथं अश्रू चिरंतन आहे.

पुस्तकालाही कान असतात, पण ते मुरगळायचे नसतात. त्यालाही पाठीचा कणा असतो, पण त्याला इजा करायची नसते. त्यालाही जाकिट असतं (कधी कापडी तर कधी कागदी), पण ते फाडायचं नसतं. त्याच्या पानापानात रस असतो म्हणून त्याचं रसग्रहण करायचं असतं.''

**- छंद अक्षरांचा**

## *लेखकाची साहित्य संपदा*

- माजी प्रमुख व प्रपाठक इंग्रजी विभाग
- माजी प्राचार्य नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड कॉमर्स, कोल्हापूर
- पदव्युत्तर अधिव्याख्याता
- संशोधन मार्गदर्शन

**प्रकाशित साहित्य**

- लोन्लिनेस इन मॉडर्न अमेरिकन पोएट्री
- प्रतिभेच्या पंखावर : जेफ्री चॉसर ते टेड ह्यूझ
- शब्दसावल्या (कविता संग्रह)
- लोन्लिनेस इन इंग्लिश पोएट्री
- पाथेय भाग-१
- पाथेय भाग-२
- छंद अक्षरांचा (ललित लेख)

**आगामी**

- द टाइम इझ आऊट ऑफ जॉइंट (नॉव्हल)
- आधुनिक मराठी काव्यातील एकाकीपणाची भावना
- कथासंग्रह
- कादंबरी
- काव्यसंग्रह

## अनुक्रमणिका


- पायी चालताना .../११
- गावाकडची झाडं /१६
- घर /२०
- विजयाची दिशा /२५
- मनातली माणसं /२९
- माणसं /३५
- वाटेवरची आशा /३९
- पडद्यामागून प्रेरणा /४३
- अनर्घ अश्रू /४८
- काटेरी तार /५२
- शिवारातलं हिरवं सोनं /५६
- छंद अक्षरांचा /६१
- शब्द /६६
- लेखन /७०
- आमचे मामा /७५
- फाळके गुरुजी /८१
- हरकामी मंजाबाई /८६
- आमचे अण्णा /९०
- काही प्रश्न ? /९५
- मुलाखतीच्या अंतरंगात /९९
- एकटच्या मनाच्या कलानं / १०५
- खरं स्वप्न / १०९

❍ चंद्र मला, असा भावला / १११
❍ पाऊस न्यारा न्यारा /११४
❍ गवत आणि आकाश / ११९
❍ मैत्र जिवाचे / १२४
❍ चूकभूल देणे घेणे /१२७
❍ श्रद्धा / १३३
❍ मौन आणि भांडण /१३७
❍ मी, मोट आणि तानी /१४३
❍ रस्त्याच्या कडेने /१५०
❍ मावळता सूर्य / १५७

✦✦✦

# पायी चालताना...

रस्त्यानं पायी जाण्यात एक वेगळाच आनंद असतो. शरीर कार्यरत असतं. मन शांत असतं. कित्येक गोष्टी करायलाच नव्हे, तर त्यांचा विचारही करायला आपणास वेळ मिळत नाही. चालताना मात्र अशा अनेक गोष्टींचे हिशेब आपण चुकते करतो. चालणं हे चिंतनाला अनेकार्थांनी पोषक ठरतं. कधी विजेसारखा एखादा विचार सुचून जातो; तर कधी कवितेच्या चार ओळी जुळून जातात. रस्त्यानं चालताना आपण एकटे असतच नाही कधी ! अगदी गावाबाहेर गेलो तरी निसर्ग मानवाची नेहमी साथ करतो. आजच्या गजबजलेल्या शहरात तर नानाप्रकारची माणसं आपल्याबरोबर येत-जात असतात. सर्वांशी आपला परिचय असत नाही हे खरं. तरीही आपले माणुसकीचे बंध आणि ऋणानुबंध प्रत्येक नजरेत घट्ट होतात. कित्येक चेहरे आपणास भेटतात. त्यात काही परिचित असतात, पण ओळख पटत नाही. काहींची ओळख पटते, परंतु परिचय केव्हा झाला, स्मरत नाही. रस्त्यावर माणसं नेहमीच वेगळी दिसतात. त्यांच्या सुप्त भावना त्यांच्या मुक्त वागण्यातून व्यक्त होतात. रस्त्यावरची माणसं मला त्यामुळंच प्रिय वाटतात. मोकळी मोकळी वाटतात.

सलगीतली एखादी व्यक्ती रस्त्यात भेटते, तेव्हा माझ्या आनंदाला पारावार उरत नाही. इथं औपचारिकतेला अर्थ असत नाही. समोरच्या माणसांशी माझा सरळ सुसंवाद सुरू होतो. माणसांना अनाहूत भेटविण्याचं काम रस्ते अगदी निरिच्छपणे करत असतात. इथे भेटण्यासाठी दरवाजे ठोठावावे लागत नाहीत. हृदयाचे दरवाजे आणि मनाच्या खिडक्या रस्त्यावर सतत उघड्याच असतात. रस्त्यावरच्या भेटीत हृदयाच्या भेटी असतात. हाताचा जागृत स्पर्श त्यात असतो. एकमेकांची मनापासून चौकशी सुरू होते. घरदार,नोकरी, वाहन, मुलंबाळं इत्यादी अनेक विषयांना ओझरता स्पर्श होतो. आपुलकीचं, माणुसकीचं नातं स्पष्ट होतं, रस्त्यावरच्या प्रश्नांबद्दल मला नेहमीच एक गूढ आकर्षण वाटतं. कधी ते अवघड असतात, आनंददायक असतात, तर कधी अनाकलनीय. असे प्रश्न आणि त्यांची मी दिलेली उत्तरं माझ्या स्मृतीत

कायमची साठून राहिली आहेत. परवाचाच एक प्रसंग- सायंकाळची सहाची वेळ असेल. घराच्या ओढीनं सगळेजण पावलापावलानं अंतर तोडीत होते. मीही तसा घाईतच होतो. एवढ्यात कुणी तरी मला हाक मारली. मागं वळून पाहतो तो, माझा मित्र. खूप दिवसांनी भेटत होतो आम्ही. त्यानं आपली कार रस्त्याच्या बाजूला थांबवली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. तो मोठ्या हुद्यावर होता आणि त्यापेक्षाही त्याचं मन विशाल होतं. याचा एक सुखद, आल्हाददायक अनुभव मला वेगळंच काही सांगून गेला. कारमधून जात असताना माझ्यासारख्या पादचारी मित्रासाठी त्यानं रस्त्यात थांबावं, हा अनुभव साधा असला तरी मधाहुनही गोड होता आणि मिठासारखा जगण्याला गरजेचा. बंगले, कार, पैसा व प्रसिद्धी यांच्या साहाय्यानं माणसाचं मूल्यमापन आणि मोजमाप करणाऱ्या या व्यवहारी जगात माझा मित्र मला अंतर्मुख बनवून गेला. 'सध्या काय करतोस', 'कसं काय चाललंय', आणि 'पुढं काय व्हायचं ठरवलंयस', हे माझ्या मित्राचे प्रश्न माझ्या मनात तेव्हापासून सतत घुसळत, उसळत राहिले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरं शोधतानाच मी मला कळत गेलो आहे.

काहीतरी करावं, काहीतरी व्हावं ही मानवी ऊर्मी आहे. प्रयत्नाअभावी आणि कित्येकदा प्रयत्न करूनही आपण काहीच होत नाही, असा कित्येकांचा अनुभव असेलही. म्हणून काही त्याचं मानवपण तसूभरही कमी होत नाही. मी कसा झालो, हे सांगण्याइतका मी मोठा नाही हे खरं आहे. आपणही काही तरी व्हावं, काही चांगलं करावं असं मला सातत्यानं वाटत आलं आहे, हे मात्र नक्की. जीवनाच्या प्रवासात अनेक वळसे येतात, वळणं येतात. वळणाबरोबर वळावं लागतं, कालगतीबरोबर जावं लागतं, ते थांबता येत नाही म्हणून. निवड ही जशी अवघड गोष्ट आहे, तशी आपली नेमकी आवड काय हे सांगणंही अवघड आहे. जगण्याच्या प्रक्रियेत अनेक छंद जडतात. जुने मागं पडतात, नवे हसतमुखानं पुढं येत असतात. सगळ्यांचं स्वागत करता येतंच असं मात्र नाही. तरीही आपण जमेल तेवढं करतो. एखाद्या अनोळख्या ठिकाणी चार रस्ते मिळावेत आणि त्यातला नेमका रस्ता निवडताना आपली जी अवस्था होते, अगदी तसंच जीवनात निवड करताना घडतं. सर्वच रस्ते एका माणसाला एका वेळी चालता येत नाहीत, ही तर आपली अडचण आहे. तसं असतं तर किती मजा आली असती ! जगच जिंकता आलं असतं असं मला राहून राहून वाटत आलं आहे.



निवड करण्याचे, निर्णय घेण्याचे लहानसहान का असेनात अनेक प्रसंग प्रत्येकावर येत असतात. तसे ते माझ्यावरही आले आहेत. शिकताना विषयांची, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीची व वाचनात पुस्तकांची निवड मला करावी लागली होती. ज्यांच्याबरोबर आपण मोकळेपणानं बोलू-चालू, अशा माणसांच्या बाबतीतही निवड करावी लागली आहे. साधेपणा हा माझा गुणधर्म आहे की नाही, हे मला नाही सांगता येणार ! पण मला साधेपणा आवडतो, साधी माणसं आवडतात, साधे आचार-विचार आवडतात, हे मात्र नक्की.

या साधेपणाला स्पष्टवक्तेपणाची जोड मिळते, तेव्हा तर सत्य डौलानं मिरवताना मी पाहतो आणि सत्य तर मला माणसापेक्षाही प्रिय वाटतं. ॲरिस्टॉटल एकदा म्हणाले होते, ''प्लेटो मला केवळ प्रिय आहे, परंतु सत्य हे प्लेटोपेक्षाही प्रिय आहे.'' माणूस मर्त्य आहे, सत्य अमर आहे. सत्य सुंदर आहे. सुंदरतेपुढं माझं मस्तक नमतं आणि मन तिथंच रमतं. मग ते सौंदर्य काळ्याभोर दगडाचं असेल,अथवा संगमरवरी पांढरं शुभ्र असेल. एखाद्या प्रमदेचं नाजूक वस्त्र सळसळताना उमगलेल्या लावण्याचं असेल अथवा पुरुषाच्या पराक्रमाचं. चांदण्यांच्या दूरच्या हाकेत असेल वा माझ्यापर्यंत नित्यनियमानं आपल्या किरणांच्या रूपानं पोहोचणाऱ्या सूर्यतेजाचं असेल. सौंदर्य ही एक वृत्ती आहे, ती एक भक्ती आहे आणि म्हणूनच मला ते सुवर्णकणाइतकंच लोहकणातही दिसतं. सारं अस्तित्वच सुंदर आहे. मग ते कोणाचंही आणि कशाचंही असो !

माझ्या अशा वृत्तीमुळंच जगण्यावर माझी गाढ श्रद्धा बसते. बोचणारे काटेआणि फुलांच्या मुलायम पाकळ्या यांच्याकडं मी तटस्थपणे पाहू शकतो. मनाचा समतोल राखू शकतो. आनंदाच्या शिखरावरून मी कधी दुःखाची खोली पाहिलीय, तर कधी दुःखाच्या गर्तेतच आनंदाच्या गुहा बांधल्यात. अत्यानंदाच्या आणि अतिदुःखाच्यावेळी माझी मनोवृत्ती स्थिर राहू शकते. याचं प्रमुख कारण म्हणजे माझं वाचन. अशा दोन्हीही प्रसंगात मला पुस्तकंच प्रिय वाटतात. पुस्तकांतील नव्यानव्या विचारांशी समरस, एकरूप होताना माझ्या मानसिक अवस्था मी पार विसरून जातो. अत्यानंदात मला सावरताना 'हॅम्लेट' उपयुक्त वाटतं, तर दुःखावेग आवरताना 'मिडसमरनाइट्स ड्रिम' वेगळाच आनंद देऊन जातं. वाचनासाठी पुस्तकांची निवड मी अशी करतो. पुस्तकात हरवत जात असतानाच मी स्वतःलाच सापडत गेलो आहे.

बाह्यनिसर्गात पाहाण्यासारखं खूप काही असतं. क्षणाक्षणाला निसर्ग मोह घालतो. आपल्या काही मर्यादांमुळं निसर्गाच्या प्रत्येक हाकेला आपण 'ओ' देऊ शकत नाही. पण काही मोह अनावर होतात. काही छंद आवश्यक वाटतात. जलाशय हा माझ्या आवडीचा, जिव्हाळ्याचा विषय. हरिद्वारला गंगेच्या निळ्याशार पाण्यात माझं मन मी धुतलं आहे. ऋषिकेशच्या गंगेत मी स्वतः विस्तारलो आहे. तिथल्या झुलत्या पुलावरून चालताना मन साशंक होतं; पण पाय मात्र बेदरकारपणे मला पुढं ओढीत होते. पायांनाही छंद असतात-कधी वाळ्याचे, कधी वाऱ्याचे तर कधी पैंजणाचे. पाय चालतात तेव्हा मी थकत मात्र कधीच नाही.

ताजमहाल हा सर्वांच्याच कुतूहलाचा विषय. ताजमहाल पाहत असताना विस्मय आणि विचार, कल्पना आणि भावना यांच्या लाटा माझ्या मनात उसळून गेल्याची गोड अनुभूती मी आजही जपली आहे. ते असं एक विस्मयस्थान आहे की, पाय जिथून हालत नाही, मन बसलेलं उठतच नाही. विंदा करंदीकरांची ''यमुनेच्या तीरावर ताजमहाल थोडा थोडा कलतो आहे'' ही काव्यपंक्ती मला तिथं स्मरली, तेव्हा ऐतिहासिक कलाकृती व काव्यात्म आनंदात मी यमुनेच्या काठी न्हालो होतो. ताजमहाल पाहताना मी एकटा होतो..... माणसं होती.... पण टूरिस्ट्स. ज्यांच्याशी हक्कानं बोलावं, प्रेमानं सांगावं, काही हितगुज करावं अशी व्यक्ती माझ्याबरोबर नव्हती. ही खंत आजही बोचते आहे. तिथून निघताना पुढं पुढं जात मी मागं मागं वळत होतो. ताजमहालनं माझ्यात माया आणि मोह ओतप्रोत भरलेले होते. शहाजहान व मुमताज यांच्या प्रेमानं ताजमहालाच्या रूपानं उंची गाठली आहे, जगच व्यापलं आहे. प्रियतमाचं स्मारक असावं तर असं, शांत शीतलतेतच भिजलेलं, संगमरवरी शुभ्र. सरितेनं आपल्या खांद्यावर झेललेलं. पाणीच ज्याला साक्ष आहे, असं पूर्ण आणि पवित्र.

पुन्हा एकदा निवड करायची वेळच आली, तर सूर्य बनून दिवसभर एकटा तळपत सर्व जगाचं अवधान केंद्र होण्यापेक्षा मिणमिणत्या तारकांमधला चंद्रमा होणं मी पसंत करीन. वीज बनून एकेरी, एकरंगी लखलखाट होण्यापेक्षा इंद्रधनुच्या सप्तरंगात स्वतःला पाहाणं मला जास्त आवडेल. सामान्यातला सामान्य म्हणून जीवन जगताना मला तिळमात्रही संकोच वाटणार नाही. प्रचंड अग्नी माणसाच्या स्मृतीत राहतो, तसा मिणमिणता दुर्लक्षणीय काजवाही. फरक एवढाच की, त्या प्रचंड अग्नीची संहारकता भय वाढविते तर अंधारातला काजवा एका क्षणाचं का असेना अभय



देतो. तो अग्नी पोकळीतून आभाळ जिंकायला चालल्यासारखा वाटतो, तर तो काजवा चिरंतन पायाशी पडलेल्या मातीवर प्रकाशाची फुंकर घालतो. मातीशी आपलं नातं सांगतो. वस्तुमात्राच्या जीवनाचा आदी आणि अंत मला काजव्यात दिसतो. मी आणि काजवा वेगळे नसतोच मुळी ! आणखी एकदा निवड करायची वेळच आली, तर पृथ्वीच्या वैभवापेक्षा मी माझं साधं, सरळ चार भिंतीचं मातीचं घरच निवडीन. त्यातच माझी नजर स्थिर राहते. चित्त एकाग्र असतं. त्या घरातील व्यथा-वेदनातच मला वैभवाचे अधूनमधून येणारे क्षण भेटतात. वैभवाशी घनदाट मैत्री करून अतिपरिचयानं ती तुटली जाण्यापेक्षा त्याच्याशी तोंडओळख असण्यातच मी स्वतःला धन्य समजतो.

✦✦✦